भाडेपट्टा प्रकरण - ४
(शिवनिकेतन ट्रस्ट डोंबिवली)

क्र. महसूल. क. १. टे. ४. एलबीपी. कावि. ८२५ अ
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दि. ८.९.१९९७

वाचा :- १. शासनाचे शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र. इबीसा. १०७५/ [ २७८/९५ ] / माशी ८ दि. २६.९.१९९५.
२. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील इबीसा१०९७/जमवि-१५८ दि. १२.६.९७ ची तार
३. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अ. शा. प. क्र. इबीसा. १०९७/१७४/९७ मा. शि. ८ दि. ११.६.९७ चे पत्र
४. शिक्षण अधिकारी [ माध्यमिक ] जिल्हा परिषद ठाणे यांचेकडील पत्र क्र. जाक्र/ठाजिप/माशि / काक-११/बीसा/९६-९७ दि. ३.६.९७.
५. या कार्यालयाचे आदेश क्र. महसूल. क. १. टे. ४. एलबीपी. कावि. ७५५ दि. २७.६.९७.
६. अध्यक्ष, शिव निकेतन ठाणे यांचे दि. २२.७.९७ चे पत्र

---

TRUE COPY
ATTESTED BY
Principal
Bharatiya Sainiki Vidyalaya
& Jr. College, Khadavali,
Tal.-Kalyan, Dist.-Thane.

आदेश :-
======

ज्या अर्थी शासनाचे शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र. इबीसा/१०९५/[२७८/९५] माशी-८ दि. २६.९.९५ चे शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यात माध्यमिक स्तरावर सैनिकी शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यात माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावर सैनिकी शिक्षणाची आवश्यकता विचारात घेऊन प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक अशा ३० सैनिकी शिक्षण देणा-या सक्षम व स्वयंसेवी संस्थांना सन १९९६-९७ पासून उघडण्यास परवानगी देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

इच्छुक व स्वयंसेवी संस्थेची निवड करण्यासाठी सहाय्यक संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती नेमण्यांत आली असून या निवड समितीने उपोद्घातील क्र. २ च्या तारेने ठाणे जिल्ह्यासाठी शिव निकेतन ट्रस्ट डोंबिवली [ पुर्व ] जि. ठाणे या संस्थेस शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यांत आली आहे.

शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय दि. २६.९.१९९५ मधील परिच्छेद ११ नुसार निवड समितीने निवड केलेल्या संस्थेस जिल्हाधिकारी मार्फत ३० एकर जमीन नाममात्र मुल्य घेऊन ३० वर्षाच्या भाडे पटटया करारावर देण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. ठाणे जिल्ह्यात अशी सैनिकी शाळा सुरू करण्यात आवश्यक असलेली ३० एकर जमीन उपलब्ध न झाल्यामुळे मौजे खर्डी ता. शहापुर येथील स. नं. २२५ मधील ८ हेक्टर ६६ आर ६ प्रती एवढी जमीन उपलब्ध झाली होती. तसा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असुन सदर जमीनीचा आगाऊ ताबाव उपोद्घातील अ. क्र. ५ अन्वये श्री. शिव निकेतन ट्रस्ट यांना देण्याचे आदेश पारित केले होते. तथापि, सदर संस्थेस दिलेली जमीन

२/-...